निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०४/२०२२/०१८१ दिनांक-२०.०४.२०२२

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :२३.०२.२०२२
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:१४.०३.२०२२
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :०४.०४.२०२२
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :२८.०४.२०२२

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०४/२०२२</u>**

**अपीलकर्ता:** श्री. संजय शिवाजी पाचंगे

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २१.०२.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २३.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २१.०२.२०२२रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक ३०.०३.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०४.०४.२०२२ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १२.०४.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक १९.०४.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांनी वैयक्तीक मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

माहितलेली माहिती:-

सन २००३ ते २०२२ कृषी पंपाचे विज बिल नुकसान भरपाई बाबत म.रा. सरकारने विद्युत नियामक आयोगा बरोबर केलेला पत्र व्यवहार, शासन निर्णय, परिपत्रके, विज बिल माफी, सवलत, नुकसान भरपाई, अनुदान याबाबत केलेला पत्रव्यवहार, त्यास आयोगाने दिलेले उत्तर, त्यावर आयोगाने घेतलेला निर्णय, कृषी पंपाचे विज दराचे सन २००३ ते २०२२ अयोगाने ठरवून दिलेले टेरीफ, २७ मे २००५ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी या बाबत झालेला पत्रव्यवहार, महावितरण कंपनीला अयोगाने ठरवून दिलेले कृषी पंपाचे विज दर, राज्य सरकारने महावितरणला सन २००३ ते २०२२ या कालावधीत कृषी पंपाचे बिलाचे नुकसान भरपाईसाठी दिलेली रक्कम याची माहिती नक्कल प्रत मिळावी.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-

Information has sought, as per your quires you may kindly refer MERC Tariff Orders:-

Case No 54 of 2005 dated 29.09.2006; Case No 65 of 2006 dated 18.05.2007; Case No 72 of 2007 dated 20.06.2008; Case No 116 of 2008 dated 17.08.2009; Case No 111 of 2009 dated 12.09.2010; Case No 100 of 2011 dated 30.12.2011; Case No 19 of 2012 dated 16.08.2012; Case No 121 of 2014 dated 26.06.2015; Case No 48 of 2016 dated 3.11.2016; Case No 195 of 2017 dated 12.09.2018; Case No 322 of 2019 dated 30.03.2020.

Above Orders are available in downloadable format on Commission's websites www.merc.gov.in **

प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-

माहिती देण्यास हेतूपुर्वक टाळाटाळ, माहिती मिळाली नाही.

अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-

अपीलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक निवेदनावरून व अपीलातील मुद्दयावरून असे दिसून येते कि, अपीलार्थी यांना त्यांच्या माहिती अधिकार अर्जाच्या अपिलार्थी यांना फक्त Tariff Order च्या आदेशांची यादी दिल्याचे दिसून येत आहे व अपिलार्थी यांनी त्याच्या माहिती अर्जात नमूद खालील मुद्यांना अनुसरून माहिती दिलेली नसल्याचे दिसून येत नाही:-

१. सन २००३ ते २०२२ कृषी पंपाचे विज बिल नुकसान भरपाई बाबत म. रा. सरकारने विद्युत नियामक आयोगा बरोबर केलेला पत्र व्यवहार.
२. शासन निर्णय,

३. परिपत्रके, विज बिल माफी, सवलत,
४. नुकसान भरपाई, अनुदान याबाबत केलेला पत्र व्यवहार, त्यास आयोगाने दिलेले उत्तर, त्यावर आयोगाने घेतलेला निर्णय,
५. कृषी पंपाचे विज दराचे सन २००३ ते सन २०२२ आयोगाने ठरवून दिलेले कृषी पंपाचे विज दर,
६. राज्य सरकारने महावितरणला सन २००३ ते २०२२ या कालावधीत कृषी पंपाचे बिलाचे नुकसान भरपाईसाठी दिलेली रक्कम या मुद्यांवर काहिच माहिती दिलेली नाही किंवा वरिल मुद्या क्र. १ ते ६ कार्यालयात उपलब्ध नाही असेही नमूद केलेली नाही करिता, जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, अपील निकाली काढण्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसाचे आत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून द्यावी किंवा कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्ट कळवावे जेणे करून अपिलार्थी यांचा माहिती अर्ज निकाली निघून त्यांना न्याय मिळेल.

वरिल मुद्यांना ग्राह्य धरून सदर अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

निर्णय

अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. संजय शिवाजी पाचंगे,
मु.पो. ढोकसांगवी,
ता.शिरुर,
जि. पुणे-४१२ २२०.
मो.नं.९८२२३१५९४७

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**